# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी – ०२२–२६५४३४१४/२६५२६२८५
ई – मेल – coe4you@exam.mu.ac.in

परिक्षा नियंत्रकांचे कार्यालय,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.


क्र./परिक्षा/प.नि.का./ १३५३ /२०१३ दि.२१ सप्टेंबर, २०१३

## परिपत्रक

**विषय :– अपंग, सेरेब्रल पास्लीनेबाधीत तसेच अध्ययन अक्षमता अशा आजारांनी ग्रस्त व्यक्तींना परीक्षांमध्ये सवलती देणेबाबत....**

**संदर्भ :– मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे दि.१६ नोव्हेंबर, २००६ चे आदेश**

सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक तथा विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, आपापल्या महाविदयालयात/संस्थेत शिक्षण घेत असलेल्या अपंग, दृष्टिहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पास्लीने बाधीत व्यक्ती तसेच अध्ययन अक्षमता (Learning Disability) जसे Dyslexia, Dysgraphia & Dyscalculia अशा आजारांनी बाधीत व्यक्तींना परीक्षांमध्ये विविध प्रकारच्या सवलती देण्यात याव्यात असे आदेश शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त झालेले आहेत. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहे.

**अ) अपंग विद्यार्थ्यांकरीता :– (दृष्टिहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पास्लीने बाधीत)**

१) अपंग परिक्षार्थीला लेखी परीक्षेसाठी लेखणीकाची सवलत देण्यात यावी यासाठी शासनाच्या दि.२० डिसेंबर, २००६ रोजीच्या परिपत्रकात दिलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे कार्यवाही करावी.

२) लेखी परीक्षेच्या कालावधीमध्ये दर एक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात यावी, म्हणजेच तीन तासाच्या परीक्षेसाठी ६० मिनिटे अतिरिक्त देण्यात यावी.

३) दृष्टिहीन उमेदवारांना उत्तपत्रिका लिहीताना ब्रेललिपीचा वापर करण्याची/संगणक/ टंकलेखन यंत्र वापरण्याची मुभा राहील.

**ब) अध्ययन अक्षमता (Learning Desiability) :–**

४) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांना आवश्यकता असल्यास लेखणिक पुरविण्यात यावा.

५) या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या कालावधीच्या २५% अतिरिक्त वेळ देण्यात यावी. सदर अतिरिक्त वेळ किमान १५ मिनिटे परंतु जास्तीत जास्त ३० मिनिटापर्यंत देण्यात यावी.

६) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांच्या Spelling Mistakes, Gremmatical Errors, Incomplete Sentence, गणितीय चुका यांच्यामध्ये लेखी परीक्षेचे पेपर तपासताना सवलत देण्यात यावी.

७) अशा विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असल्यास एकुण २० गुणांपर्यंत वाढीव गुण देण्यात यावे.

# मुंबई विद्यापीठ

परिक्षा नियंत्रकांचे कार्यालय,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०० ०९८.

दुरध्वनी — ०२२—२६५४३४१४/२६५२६२८५
ई — मेल — coe4you@exam.mu.ac.in


८) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांवर पृष्ठ क्र.३ वर वरच्या बाजुस अध्ययन अक्षमता (Learning Disability) असे मोठया अक्षरात नमुद करून सदर उत्तरपत्रिका स्वतंत्र लिफाफ्यात बंद करून मुल्यांकनासाठी पाठवावी. सदर लिफाफ्यावर देखील अध्ययन अक्षमता (Learning Disability) असे स्पष्ट नमुद करून लिफाफ्यात असणा—या उत्तरपत्रिकांची एकुण संख्या नमुद करणे आवश्यक असेल याची नोंद घ्यावी.

९) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलतीबाबत शासनाच्या दि.०४ ऑगस्ट, २००४ रोजीच्या परिपत्रकातील सविस्तर सुचना कृपया पहाव्यात.

**क) <u>सर्वसाधारण सुचना :—</u>**

१०) अतिरिक्त वेळेबाबत उमेदवारांचा गोंधळ किंवा संभ्रम टाळण्यासाठी अशा विद्यार्थ्यांची शक्यतो तळमजल्यावर स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात यावी.

११) असे परीक्षार्थी व लेखणीक हे शक्यतो एकाच विद्याशाखेचे असावेत मात्र लेखणीकाची शैक्षणिक पात्रता परीक्षार्थीपेक्षा एक पायरी/टप्पा/वर्ग खालचा/कमी असावा.

१२) परीक्षार्थी अपंग, अध्ययन अक्षमता असलेल्या उमेदवार लेखणीक घेणार असल्याबाबत लेखी अर्ज परीक्षा केंद्राच्या प्राचार्यांना करणे आवश्यक आहे.

१३) अपंगत्व अथवा अध्ययन अक्षमता असलेल्या परीक्षार्थी यांनी अशा प्रकारच्या असमर्थतेबाबतचे सक्षम वैद्यकीय अधिकारी (Civil Surgeon / Govt. Medical Officer) यांचे प्रमाणपत्र सोबत जोडुन, सदर सवलत हवी असल्याबाबतचा लेखी अर्ज प्राचार्यांना करणे आवश्यक आहे.

१४) त्याचबरोबर अलिकडेच प्राप्त झालेल्या भारत सरकारच्या सामाजिक न्याय विभागाच्या दि.२६ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या कार्यालयीन परिपत्रकात दिलेल्या तपशीलवार सुचनांप्रमाणे आवश्यक असलेली कार्यवाही प्राधान्याने करावी.

सर्व प्राचार्य, संचालक तथा विभागप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकातील तसेच दि.०४ ऑगस्ट, २००४, दि.२० डिसेंबर २००६ व भारत सरकार, सामाजिक न्याय विभागाचे परिपत्रक क्र. F.No.16-110/2003-DD.III दि.२६ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या परिपत्रकांतील सविस्तर सुचनांचे तंतोतंत पालन करावे. तसेच सदर परिपत्रक सर्वांच्या माहीतीसाठी सर्व सुचना फलकांवर प्रदर्शित करावे.

सदर सर्व सुचना वरीष्ठ व कनिष्ठ अधिकारी तसेच पर्यवेक्षक यांना आपण स्वत: द्याव्यात.

धन्यवाद,

**परीक्षा नियंत्रक**

**सहपत्र : दि.०४ ऑगस्ट, २००४, दि.२० डिसेंबर २००६ व दि.२६ फेब्रुवारी, २०१३ चे परिपत्रक**

2004
Sion Hosp.

# Concessions to students with Learning Disability, in the Govt., Govt.-aided / Professional and Non- professional colleges in Non-agricultural universities / Engineering / Polytechnics and Teachers Training Colleges.

Govt. of Maharashtra
Higher and Technical Education Dept.
Circular No.USC 2004/(86/04) Extra Ord. 4,
Mantralay Annexe, Mumbai 400 032.
7th August 2004

Ref: 1) Govt. Resolution School Education Department No.SSC 1099/151/99 HSC- 2 Dt 28th Nov.2000.
2) Govt. Resolution, School Education Dept. No.MISC-1021(1501) Primary Education 5 dt. The 13th November 2001.
3) Govt. circular, School Education Dept. No.MISC1021/1501- Primary Education 5 dt. The 23rd September 2003

Preamble - Various Concessions to Learning Disabled students upto Std.XII have been given vide Govt. Resolutions referred to above. The proposal of giving same concessions to the students having learning disability, studying in Colleges / Engineering (Degree/Diploma) and Teachers Training Colleges, was under consideration of the Govt.

Govt. Resolution: The Govt. has taken a decision to give following concessions to the students having learning disability in Govt./Govt.- aided / Professional and Non-professional/Colleges under Non- Agricultural Universities / Engineering / Polytechnics and Teachers Training Colleges. Accordingly, all concerned are informed that students having Dyslexia, Dyscalculia, Dysgraphia are included as students with learning disability and are being given following concessions:

## Concessions to students with Learning Disability :

1) Oral examination of students with Learning Disability should be taken by the Professors concerned at the time of unit tests and semester / term examinations. Marks obtained should be noted / recorded and their annual average be worked out. On the basis of these marks, promotion to the next class will be decided.

2) All students with Learning Disability should be provided writers at the time of written examination. They should also be given half an hour extra time than the stipulated time at each examination.

3) The students with Learning Disability should be given examination center near their houses.

4) The students should be exempted from drawing figures, maps, charts, graphs etc. in the written examination. They will get the facility of adjusting the marks of these questions and sub questions / supplementary questions.

5) These students will be permitted to submit certificates from the concerned recognized authorized institutions to the effect that they have completed the required work-experience / social service and practicals.

6) A maximum of 20 marks should be given as grace marks for passing to these LD students who have failed in the examination.

7) Students with disabilities like Dyslexia and Dysgraphia should be permitted to select one subject under work - experience in lieu of one language from the total compulsory languages.

8) These students will have concessions in mistakes in such matters as spellings and arithmetical calculations

9) These students should be given 25 per cent more time i.e. (15 minutes) for one-hour paper but maximum 30 minutes more time for two or more hours papers in the Annual Examination..

Action to be taken by the concerned officers for the students with Learning Disability:

1) Directors / Joint Directors concerned should hold a meeting of professors and principals of the colleges in their jurisdiction in the beginning of every academic year and give them detailed information / instructions about the facilities extended by the Govt. to the students with Learning Disabiity. As far as possible, the office bearers of the Maharashtra Dyslexia Association should be invited to this meeting.

2) The professors concerned should certify the students as having learning disability on the basis of certificates issued by the Govt. / Govt. recognized Medical Officers.

3) Once the medical officers have issued certificates to the students that they have learning disability, the colleges should not demand such certificates again and again.

4) It is essential that the concerned principals should furnish the list of students appearing for examination along with the Learning Disability Certificates to the Universities concerned and to the Director at the beginning of the Academic Year itself.

5) The Universities / Examination Boards will make available to the students and their parents the authorized curriculum on basis of which the examinations would be held .

6) All concerned should take precautions that the eligible students are not deprived of the concessions granted by the Govt. to the students with Learning Disability.

7) Vice-chancellors of all Non-agricultural Universities under the Higher and Technical Education Dept. should take action to implement these orders.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(V. G. Dalvi)
Under Secretary to Govt.

क्र. अकआ/प्र-७/लेखनिक/परीक्षा/
०६-०७/२९५१
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे-१
दिनांकः - २० डिसेंबर, २००६.

परिपत्रक / महत्वाचे
मा. मुंबई उच्च न्यायालय प्रकरण प्राधान्य

विषयः- दृष्टिहीन, अल्पदृष्टि आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधीत झालेल्या व्यक्ती, लिहीण्यास सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनीक पुरविणे व अतिरिक्त वेळ देणेबाबत.

संदर्भः- १) अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग ) अधिनियम १९९५

२) मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे याचिका क्रमांक ७०/२००२ व १२९/२००३ प्रकरणात दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ चे आदेश.

३) मुख्य आयुक्त, अपंग कल्याण, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्र. २७-ओ.आर/(३) / सीसीडी / ९९, दिनांक १४/०५/२००३ व क्र. २७ - ओ.आर/(३) / सीसीडी / ९९ / ६६०८, दिनांक ०२/०८/२०००.

४) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्रमांक अपंग-२००६/प्र.क्र.१०५/सुधार-३, दिनांक १ डिसेंबर, २००६.

अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग ) अधिनियम १९९५ मधील तरतूदीनूसार व मा.मुंबई उच्च न्यायालय दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक ७०/२००२ व १२९/२००३ संदर्भात प्रकरण प्राधान्य मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागात त्यांच्या अखत्यारीत असलेला अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याचे आदेश आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणात असे दिसून आले आहे की, दृष्टिहीन, अल्पदृष्टि आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधीत झालेल्या व्यक्ती, यांच्या पदभरतीकरीता ज्या पदाबाबत लेखी परीक्षा घेण्यात येतील त्यावेळी त्यांना लेखनिकाचे सहाय घेण्यास परवानगी देण्यात येत नाही. यामुळे सदर व्यक्तींवर होणारा अन्याय टाळण्याच्या दृष्ठीने सर्व नियुक्ती प्राधिका-यांना कळविण्यात येत आहे की, अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग ) अधिनियम १९९५ मधील प्रकरण क्रमांक ५ व ६ मधील तरतूदीनूसार दृष्टिहीन, अल्पदृष्टि आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधीत झालेल्या व्यक्ती यांना लेखनिक उपलब्ध होण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

शैक्षणिक परीक्षा / नेमणूकीसाठी घ्यावयाची परीक्षा यासाठी अपंग उमेदवारांना लेखनिकाची सवलत देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे.

१) अपंग उमेदवाराला परीक्षेसाठी लेखनिक हा परीक्षा घेणा-या प्राधिका-याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्यांची इच्छा असल्यास स्वतः लेखनिकाची व्यवस्था करावी.

२) परीक्षेच्या वेळी पर्यवेक्षक आणि समवेक्षक यांनी योग्य ते पर्यवेक्षण करुन फसवणूकीचे किंवा तत्सम गैर प्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३) प्रत्यक्ष अडचणी विचारात घेवून जर परीक्षा घेणा-या प्राधिका-याने लेखनिक पुरविला असल्यास, त्या प्राधिका-याने त्या लेखनिकाची सक्षमता तपासून निश्चित करुन घ्यावी.

४) परीक्षा घेणा-या प्राधिका-याने नेमणूकीच्या जाहिरातीमध्ये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत सुस्पष्ट उल्लेख करावा.

५) उमेदवाराने परीक्षा आयोजित करणा-या संबंधित यंत्रणेकडून लेखनिक घेणार आहे किंवा उमेदवार स्वतः लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याचा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

६) परीक्षा घेणा-या यंत्रणेने परीक्षेच्या आवश्यकते प्रमाणे लेखनिकाची निवड करुन जिल्हा/विभागीय किंवा राज्य पातळीवर त्याचे पॅनेल तयार करावे.

७) लेखनिकाचे पॅनेल हे आवश्यकते प्रमाणे त्या-त्या शाखेनुसार उदा. कला, वाणिज्य, विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, वैद्यकीय इ. विषयाप्रमाणे करावे व फक्त सक्षम आणि पात्र लेखनिकाचा त्या पॅनेल मध्ये समावेश करावा.

८) शक्यतो परीक्षार्थी व लेखनिक हे एकाच शाखेचे असावेत.

९) उमेदवाराने स्वतःचा लेखनिक आणला असेल व जर तो लेखनिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असतील तर तो लेखनिक उमेदवाराचे शैक्षणिक पात्रते पेक्षा एक पायरी / टप्पा कमी असावा. मात्र लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास त्यांस ही अट लागू राहणार नाही.

१०) वर उल्लेखलेल्या शिवाय इतर कोणतेही निर्बंध लेखनिकाच्या निवडीवर असू नयेत.

११) काही अपवादात्मक परीस्थितीत परीक्षा सुरु होणाच्या ऐनवेळी लेखनिक बदल्यास मान्यता देण्याचे अधिकार मुख्य समवेक्षक यांना राहतील.

१२) वेगवेगळ्या विषयाच्या पेपरसाठी एका पेक्षा अधिक लेखनिक वापरता येणार नाहीत. मात्र वरील ११ प्रमाणे अपवादात्मक परीस्थितीमध्ये बदल करण्याची परवानगी देण्यात येईल.

१३) लेखनिकाच्या मान्यतः पत्रात खालील माहिती / तपशील मनूद करण्यात यावी.

१. परीक्षेसाठी उमेदवारास द्यावयाचा जादा वेळ

२. लेखनिकाच्या वेगळे / स्वतंत्र बसण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था

३. प्रत्येक पेपरवर परीक्षेचा दिनांक, विषय याबरोबरच लेखनिकाचे नाव इ. तपशील छापण्यात येणार असल्याची माहिती

४. अपवादात्मक परीस्थितीत लेखनिक बदलणे आवश्यक असल्यास, त्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचा पत्ता व दुरध्वनी कमांक

१४) लेखनिकास अल्पोपहार घ्यावयाचा असल्यास त्याने तो परीक्षेच्या अगोदर किंवा नंतर घ्यावा.

१५) उमेदवार व लेखनिक यांना परीक्षेच्या वेळा बद्दल संपूर्ण माहिती देण्यात यावी.

१६) अतिरिक्त वेळ :-

१. लेखी परीक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात यावा.

२. त्याच प्रमाणे परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त देताना प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.

१७) परीक्षेच्या वेळी उमेदवारांचा गोंधळ व संभ्रम टाळण्यासाठी परीक्षा सुरु होणाच्या पूर्वी योग्य अशी बैठक व्यवस्था करण्यात यावी.

१८) अपंगांसाठी बसण्याची व्यवस्था शक्यतो तळ मजल्यावर करण्यात यावी.

१९) प्रश्न पत्रिकेमधील मूळ प्रश्नांत दृष्य बाबी समाविष्ट असल्यास अथवा उमेदवाराकडून अशा दृष्य बाबींचा अर्थ लावणे किंवा दृष्य बाबींचे सादरीकरण करणे अपेक्षीत असल्यास अशा प्रश्नांचे ऐवजी पर्यायी प्रश्न पुरविण्यात यावेत. मात्र उमेदवारास उत्तर देण्यासाठी पर्यायी प्रश्नांचे ऐवजी मूळ प्रश्न निवडण्याची मुभा राहील.

२०) दृष्टीहीन उमेदवारांना उत्तर पत्रिका लिहीताना ब्रेलचा वापर करण्याची किंवा संगणक अथवा टंकलेखन यंत्र वापरण्याची मुभा राहिल. ब्रेल लिपीमधील उत्तर पत्रिकेचे मुल्यांकन हे ब्रेल लिपी जाणणा-या तज्ञ / परीक्षक यांच्याकडून करावे, शक्य झाल्यास प्रश्न पत्रिका ब्रेल लिपीमध्ये अथवा डिजिटल टेक्सट (Digital text) मध्ये पुरविण्यात यावी.

२१) एस.एस.सी / एच.एस.सी. परीक्षा मंडळे, सर्व विद्यापीठे, सर्व शैक्षणिक संस्था आणि सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी वरील सूचनांचे पालन करावे.

तरी वरील परिपत्रकाचे अवलोकन करुन संबंधीतानी त्याची त्वरीत योग्य ती अंमलबजावणी करावी व सदर विद्यार्थ्यांना दिलेल्या सुविधा सवलतींचा तपशील विद्यापीठाकडे वेळोवेळी पाठवावा.

सही

आयुक्त, अपंग कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : माहिती व कार्यवाहीस्तव सादर.

१) मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

प्रति : माहिती व कार्यवाहीस्तव.

१) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

२) सर्व विभागीय आयुक्त

३) सर्व जिल्हाधिकारी

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परीषदा

५) विभागीय समाज कल्याण अधिकारी (सर्व)

६) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर / उपनगर

७) सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परीषद

८) सर्व सेवायोजन अधिकारी, जिल्हा सेवायोजन केंद्रे

F.No. 16-110/2003-DD.III
Government of India
Ministry of Social Justice & Empowerment
Department of Disability Affairs
***

Shastri Bhawan, New Delhi
Dated: 26th February, 2013

**Office Memorandum**

Subject: Guidelines for conducting written examination for Persons with Disabilities.

The undersigned is directed to say that Chief Commissioner of Persons with Disabilities (CCPD) in its order dated 23.11.2012 in case No. 3929/2007 ( in the matter of Shri Gopal Sisodia, Indian Association of the Blind Vs. State Bank of India & Others) and in case No.65/1041/12-13 ( in the matter of Score Foundation Vs. Department of Disability Affairs) had directed this Ministry to circulate guidelines for the purpose of conducting written examination for persons with disabilities for compliance by all concerned. In compliance of the above order, this Ministry hereby lays down the following uniform and comprehensive guidelines for conducting examination for the persons with disabilities as recommended by CCPD:-

I. There should be a uniform and comprehensive policy across the country for persons with disabilities for written examination taking into account improvement in technology and new avenues opened to the persons with disabilities providing a level playing field. Policy should also have flexibility to accommodate the specific needs on case-to-case basis.

II. There is no need for fixing separate criteria for regular and competitive examinations.

III. The facility of Scribe/Reader/Lab Assistant should be allowed to any person who has disability of 40% or more if so desired by the person.

IV. The candidate should have the discretion of opting for his own scribe/reader/lab assistant or request the Examination Body for the same. The examining body may also identify the scribe/ reader/lab assistant to make panels at the District/Division/ State level as per the requirements of the examination. In such instances the candidates should be allowed to meet the scribe a day before the examination so that the candidates get a chance to check and verify whether the scribe is suitable or not.

V. Criteria like educational qualification, marks scored, age or other such restrictions for the scribe/reader/lab assistant should not be fixed. Instead, the invigilation system should be strengthened, so that the candidates using scribe/reader/lab assistant do not indulge in mal-practices like copying and cheating during the examination.

VI. There should also be flexibility in accommodating any change in scribe/reader/lab assistant in case of emergency. The candidates should also be allowed to take more than one scribe/reader for writing different papers especially for languages.

VII. Persons with disabilities should be given the option of choosing the mode for taking the examinations i.e. in Braille or in the computer or in large print or even by recording the answers as the examining bodies can easily make use of technology to convert question paper in large prints, e-text, or Braille and can also convert Braille text in English or regional languages.

VIII. The candidates should be allowed to check the computer system one day in advance so that the problems, if any in the software/system could be rectified.

IX. The procedure of availing the facility of scribe should be simplified and the necessary details should be recorded at the time of filling up of the forms. Thereafter, the examining body should ensure availability of question papers in the format opted by the candidate as well as suitable seating arrangement for giving examination.

X. The disability certificate issued by the competent medical authority at any place should be accepted across the country.

XI. The word "extra time or additional time" that is being currently used should be changed to "compensatory time" and the same should not be less than 20 minutes per hour of examination for persons who are making use of scribe/reader/lab assistant. All the candidates with disability not availing the facility of scribe may be allowed additional time of minimum of one hour for examination of 3 hours duration which could further be increased on case to case basis.

XII. The candidates should be allowed to use assistive devices like talking calculator (in cases where calculators are allowed for giving exams), tailor frame, Braille slate, abacus, geometry kit, Braille measuring tape and augmentative communication devices like communication chart and electronic devices.

XIII. Proper seating arrangement (preferably on the ground floor) should be made prior to the commencement of examination to avoid confusion or distraction during the day of the exam. The time of giving the question papers should be marked accurately and timely supply of supplementary papers should be ensured.

XIV. The examining body should also provide reading material in Braille or E-Text or on computers having suitable screen reading softwares for open book examination. Similarly online examination should be in accessible format i.e. websites, question papers and all other study material should be accessible as per the international standards laid down in this regard.

XV. Alternative objective questions in lieu of descriptive questions should be provided for Hearing-Impaired persons, in addition to the existing policy of giving alternative questions in lieu of questions requiring visual inputs, for persons with Visual Impairment.

2. It is requested to ensure that the above guidelines are scrupulously followed while conducting examination for persons with disabilities. All the recruitment agencies, Academics/Examination Bodies etc. under your administrative control may be advised appropriately to ensure compliance of implementing these guidelines. Action taken in this regard may be intimated to this office.

3. The above guidelines are issued with the approval of Hon'ble Minister (Social Justice & Empowerment).

Yours faithfully,

(Jagdish Kumar)
Deputy Secretary to the Govt. of India

To

1. Secretary of all Ministries/Department.
2. Secretary, UPSC, Shahjahan Road, New Delhi.
3. Chairman, SSC, Block No.12, CGO Complex, Lodhi Road, New Delhi-110003.
4. Chairman, University Grants Commission with a request to issue necessary instructions to all universities including Deemed Universities for compliance.
5. All National Institutes and RCI under administrative control of Department of Disability Affairs, Ministry of SJ&E, New Delhi

Copy to : CCPD, Sarojini Bhawan, Bhagwan Dass Road,New Delhi with reference to order dated 23.11.2012 in case No. 3929/2007 and in case No.65/1041/12-13.